# १ ससीक रक्षण

**म्हाइंभट**

म्हाइंभट - मराठीतील आद्य गद्य चरित्रकार मूळ सराळे (जि. औरंगाबाद) या गावाचे. विद्याध्ययनासाठी तेलंगणात प्रयाण. मामाची कन्या देआंबा हिच्याशी विवाह. दक्षिणेत अनेक विद्वांनाशी वाद-विवाद- विद्वतेची घमेंड रुजल्यामुळे आकाशातील सूर्याशी स्पर्धा - दर्पोक्ती - 'मी पृथ्वीवरचा सूर्य' : एकदा चक्रधरांशी भेट (डोमेग्राम) संस्कृत भाषेतून झालेल्या वादात चक्रधरांकडून पराभूत महानुभाव पंथात प्रवेश - गोंविदप्रभूंचे अनुसरण स्वीकारले.ऋध्दिपुरात देहत्याग.

लीळाचरित्र - उत्तरार्ध - पूर्वार्ध - एकांक हा चक्रधरांचा चरित्रग्रंथ त्यानेच परिश्रमपूर्वक लीळा संकलित करून नागदेवाचार्या कडून खात्री करून घेऊन सिद्ध केला. लीळाचरित्राप्रमाणेच ऋध्दिपूर लीळा, जतीचा दशकू - गीता टीका इ. ग्रंथ त्याच्या नावावर आहेत.

चक्रधर गृहत्याग करून एकांत अवस्थेत भटकत असतानाचा कालखंड 'एकांक' मध्ये ग्रथित आहे. एकांत अवस्थेत एकदा झाडाखाली विश्रांती घेताना पारध्याच्या भीतीने एक ससा - चक्रधरांच्या मांडीखाली लपतो त्यास चक्रधर कसे वाचवतात हे या लीळेत दिसते. भूतदया - मानवतावादी दृष्टी, पशुला ही 'महात्मे' म्हणण्यातील गौरव, निर्भयता, बिनतोडपणा या बरोबरच मराठी भाषेची वैशिष्ट्ये या लीळेतून स्पष्ट होतात.

---

गोसावियांसि गावी एकी वृक्षाखालि आसन असे : तवं पारधीं वाटे ससा सोडीला : तयापाठीं सुनी सोडिलीं : काकूलति येउनि ससा जाणू तळी रिगाला : सुणीं उभी राहिली : मग मागीला कडौनि पारधी आले : तीही वीनवील : ''ससा सोडीजो जी'' : सर्वज्ञें म्हणीतलें : 'हा एथ शरण आला' :

---

पुढती तीहीं म्हणीतले : 'जी जी : हा होडेचा ससा जी :' या कारणें सुरिया काढणीचा होती : जी जी : हो सोडावा जी' : सर्वज्ञें म्हणीतलें : 'हा गा : ए शरण आलेया काइ मरण असे' : 'जी जी : तरि गोसावीं राखीला' ॥ मग ते निगाले : मग सर्वज्ञें म्हणीतलें : 'माहात्मे हो : आतां जाए':ऐसें म्हणौनि जानु उचलीली : मग ससा निगाला : ॥

(लीळा चरित्र एकांक) लीळा क्र. २३